पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. २९११ दि. ०६/०९/२०१९**

## वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## कोयताधारी इसमास वानवडी पोलीसांनी केले अटक

दिनांक ०४/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०१ ते ०२/०० वा. चे दरम्यान वानवडी पोलीस स्टेशनचे हददीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री क्रांतीकुमार पाटील सो, यांचे दिमतीत कोंबीग ऑपरेशन दरम्यान रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करत असताना, ०१/.१५ वा. चे सुमारास एक इसम हातामध्ये कोयत्या सारखे मोठे धारदार शस्त्र घेऊन आझादनगर हेवनपार्क कडे रोडवर फिरत असलेला दिसला म्हणून त्यास पोलीसांनी हटकले असता तो पळून जाऊ लागला म्हणून कोंबीग ऑपरेशन साठी डयुटीस हजर असणारे सहायक पोलीस फौजदार गुरव, पो.ना.गिरीमकर, पो.शि.गोसावी, पो.हवा.तेलंग, पो.ना.गायकवाड, पो.ना.बोरावके, पो.ना.चौधरी, यांनी व व.पो.नि.श्री.क्रांतीकुमार पाटील यांनी सदर इसमाचा सिनेमास्टाईल पाठलाग करुन त्यास त्याचे हातातील कोयत्यासह त्याला झडप घालून शिताफीने पकडले, त्यास निशस्त्र केले नंतर त्याच नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव - सचिन ऊर्फ टिंक्या शेलार वय ३८ वर्षे, रा.स.नं.५७ आझादनगर वानवडी पुणे असल्याचे सांगितले. सदर इसमाविरुध्द मा.सह पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांचे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आदेशाचा भंग केला व जवळ कोयता बाळगला म्हणून आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास सहायक पोलीस फौजदार प्रदीप गुरव हे करत आहेत.

**(क्रांतीकुमार पाटील)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर